MHRG190001362024

**<u>विशेष दरखास्त नं.१६/२०२४ मधील निशाणी क्र.१७ खालील आदेश (अब्दुल महंमद महालदार व इतर वि. मा.विशेष भुसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, महाड वगैरे)</u>**

प्रस्तुत अर्जांनी अर्जदार/धनको यांनी एल.ए.आर.नं.३८/२००६ मधील दिनांक १७.०४.२०२३ चे निकालाचे अनुषंगाने प्रस्तुत दरखास्तमध्ये ऋणको यांनी जमा केलेली रक्कम त्यांच्या हक्कात त्यांना अदा करण्यात यावी, अशी विनंती केली.

०२. अर्ज, अर्जाला ऋणको क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.१८ व ऋणको क्र.३ यांनी निशाणी क्र.१९ वर दिलेले म्हणणे व सहा. अधिक्षक, वित्त विभाग, दिवाणी न्यायालय व. स्तर महाड यांचा अहवाल वाचला.

०३. अर्जदारातर्फे वकील बी. टी. नवाळे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. ऋणको क्र.१ व २ चे वकील गैरहजर असल्याने त्यांचेतर्फे प्रस्तुत अर्जाला निशाणी क्र.१८ वर दिलेले म्हणणे त्यांचा युक्तिवाद म्हणून ग्राहय धरण्यात आला. ऋणको क्र.३ तर्फे विधीज्ञ श्रीमती डी.ए.कामत यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सहा. अधिक्षक, वित्त विभाग, दिवाणी न्यायालय व.स्तर महाड यांच्या अहवालाचे अवलोकन करता प्रस्तुत दरखास्तीमध्ये ऋणकोतर्फे दिनांक ०७.०८.२०२५ रोजी एल.ए.आर.नं.३८/२००६ मधील दिनांक १७.०४.२०२३ चे निकालाचे अनुषंगाने **दिवाणी 'क' क्र.४७**

**ने एकूण रक्कम रु.१,६८,८२,२४५/-(अक्षरी रक्कम रुपये एक कोटी अडुसष्ठ लाख ब्याऐंशी हजार दोनशे पंचेचाळीस मात्र) अर्जदार/धनको यांचे नावे जमा केल्याचे व ते आज रोजी जमा असल्याचे स्पष्ट होते.**

०५. प्रस्तुत अर्जांनी अर्जदार/धनको यांनी एकूण जमा रक्कमेपैकी कमीत कमी रकमेच्या हमी बॉण्डवर रक्कम अदा करण्यात यावी, अशी विनंती केली.

०६. याउलट ऋणको क्र.१ व २ यांनी एल.ए.आर. नं.३८/२००६ मधील दिनांक १७.०४.२०२३ चे निकाला विरोधात मा.उच्च न्यायालयात अपील होण्याची शक्यता आहे असे गृहित धरुन दरखास्त अर्जदार यांना नुकसान भरपाईची जमा रक्कम देण्यापुर्वी त्यांचेवर काही निर्बध घालण्याची विनंती केली आहे. जमा करण्यात आलेली रक्कम स्विकारण्यास दरखास्त अर्जदार पात्र व्यक्ती आहेत अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र घेऊन आणि रक्कमेपैकी काही रक्कम दिर्घ मुदतीत ठेवीच्या स्वरुपात ठेऊन अर्जदार यांचेकडुन हमीपत्र घेऊन दरखास्त अर्जदार यांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्याची विनंती केली आहे.

०७. ऋणको क्र.३ यांनी ऋणको क्र.१ व २ यांनी मा.उच्च न्यायालयात अपील केले किंवा कसे याबाबतची कोणतीही नोटीस प्राप्त झाली नसल्याचे तसेच ऋणको क्र.३ यांनी मा.उच्च न्यायालयात अपील मुदतीत दाखल केले असुन मा.उच्च न्यायालयात प्राथमिक टप्प्यात असल्याचे नमुद केले आहे. तसेच दरखास्त अर्जदार यांचेकडुन एकुण नुकसानभरपाई पैकी नियमानुसार योग्य ती रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये मा.उच्च न्यायालयाचे अंतिम निकाल लागेपर्यत मुदतबंद ठेवण्याचे आदेश दरखास्त अर्जदार यांना देण्यात यावे आणि उर्वरित रक्कमेचे हमीपत्र सादर करण्याचे

आदेश करण्यात यावेत अशी विनंती केली आहे. दरखास्त अर्जदार हेच नुकसान भरपाई स्विकारण्यास पात्र आहेत व त्यांचेशिवाय अन्य कोणतीही कायदेशीर व्यक्ती नाही अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र दरखास्त अर्जदार यांचेकडुन घेऊन नुकसान भरपाईची रक्कम दरखास्त अर्जदार यांना देण्यास हरकत नसल्याचे नमुद केलेले आहे.

०८. एकुणच ऋणको क्र.१ ते ३ च्या कथनाचे अवलोकन करता अर्जदार/धनको यांनी केलेल्या प्रार्थनेप्रमाणे त्यांच्या हक्कात प्रस्तुत दरखास्तीमधील रक्कम काही अटीशर्तीवर अदा करणे न्यायोचित होईल, असा निष्कर्ष नोंदवून मी खालील आदेश पारित करित आहे.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. धनको यांना एकूण जमा रकमेपैकी ७५% रक्कम व्याजासहीत रुपये ५००/– च्या बॉण्डवर हमीपत्र घेऊन व ओळख पडताळणी करुन अदा करण्यात यावी.

३. उर्वरित २५% रक्कम धनको यांचे नावे ५ वर्षाकरिता राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात यावी.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2025.09.16 16:07:57 +0530

**(एच. आर. जाधव)**
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड
दिनांक : १६.०९.२०२५